Phone NO.91-7232-242456
Phone No.91-9421166335
महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता
Email : dean_vngmc@rediffmail.com
Website : www.vngmcytl.ac.in

# श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ

**SHRI. VASANTRAO NAIK GOVT. MEDICAL COLLEGE & HOSPITAL, YAVATMAL – 445001**

जा.क्र.शावैमहाव रु/कि.भां/जीएसटी दरपत्रक/ ६४५० /२०२६ दि.०६/ ०८ /२०२६

## जाहीर ई–दरपत्रक सुचना

श्री वंसतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, अति.रुग्णालय, रुग्णालय व स्त्री रुग्णालय, यवतमाळ हया चार संस्थेच्या आस्थापनेवर वर्ग-१ ते वर्ग- ०४ अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनातुन कपात होणा-या इन्कमटॅक्स बाबत फॉर्म नं. १६ तयार करणे. या संस्थेस महाविद्यालयत ६०० अधिकारी व कर्मचारी, अतिविशेषोपचार रुग्णालयत २९८ तसेच रुग्णालय ६७६ व स्त्री रुग्णालयात १३५ अधिकारी/ कर्मचारी कार्यारत आहेत.

संस्थाना पुरवठादाराकडुन खरेदी करण्यात येणा-या विविध वस्तु/साहित्य/उपकरणे यांचे प्राप्त देयकानुसार या संस्थेकडून कपात करण्यात येणाऱ्या टिडीएस संबंधी २६ क्यु तयार करणे, तसेच जी.एस.टी. रिर्टन व तत्सम कामकाज पारपाडुन त्या बाबतचा अभिलेख कार्यालयास उपलब्ध करुन देण्याकरिता त्यांचे दर एक वर्षा कालावधी करिता दर निश्चित करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठाद्वाराकडुन व्दि लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागण्यित येत आहे. सदर कालावधी दरनिश्चिती आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष करिता (इन्कमटॅक्सचे वार्षीक ४ कॉर्टर व १२ महीण्याचे जिएसटी रिर्टन भरणे अनिवार्य) राहील. सदर दरकरार हा स्थानिक (यवतमाळ शहरातील) सी.ए. किंवा टॅक्स प्रॉक्टिशन यांच्या कडून मागणात येत आहे. त्या अनुषंगाने सदरील संस्थेचे कामकाज सुरळीत चालण्याकरीता जिएसटीचे दर महा कामकाम आणि इन्कम टक्सचे रिटर्न दर तीमाही कामकाज वेळेत रिर्टन भरण्याच्या उददेशाने तयेच आय.टी शेडयुल व ASSESSMET FORM ईत्यादी कार्यवाही पारपाडण्याकरीता (सी.ए.)/ टॅक्स प्रॉक्टिशन अथवा सहकारी यांनी स्वःता संस्थेस येऊन माहीती( Working) घेऊन जाण्यात यावे.

**1) तांत्रीक लिफाफा** –या लिफाफा मध्ये पुरवठादाराने नोदंनीकृत परवाना (सी.ए.), टॅक्स प्रॉक्टिशनर व सी.ए. पदवी उर्त्तीण होऊन पाच वर्षे झालेली असावी, (सी.ए./टॅक्स प्रॉक्टिशनर) हा स्थानीक असावा (यवतमाळ शहरातील असण्याबाबतचा पुरावा वीज, पाणी देयक किंवा आधार कार्ड पुरावा म्हणून ग्राहय समजण्यात येईल.) सदर कामकाज केल्याबाबतचा अनुभव प्रमाणपत्र ( किमान एक शासकीय संस्थेचे), जिएसटी प्रमाणपत्र/नोंदणी झाल्याचे पुरावा /लागु नसल्यासबाबत प्रमाणपत्र देण्यात यावे. पॅन कार्ड, आधार कार्ड या कागदपत्राच्या छायाकिंत प्रती टाकण्यात याव्या तसेच आवश्यक वरिल सर्व कागदपत्रे व्यतीरीक्त इतर कोणतेही अनावश्यक दस्ताऐवज जोडण्यात येवु नये. त्यावर स्वस्वाक्षाकिंत करुन तो मोहोरबंद करण्यात यावा त्यावर स्पष्ट शब्दात तांत्रीक बाबीचा लिफाफा असे नमुद करुन स्वतःचे नाव व पत्ता लिहावा व तो मोहोर बंद करावा.

२) **किमंतीचा लिफाफा**-ज्यामध्ये दर नमुद असलेला कागद स्वाक्षरी व सहीनिशी टाकण्यात यावा व त्यावर स्पष्ट अक्षरात किमंतीचा लिफाफा नमुद करुन स्वतःचे नाव व पत्ता लिहावा व तो देखील मोहोर बंद करण्यात यावा.

उपरोक्त दोनही लिफाफे एका मोठया लिफाफया मध्ये टाकुण दरपत्रक अधिष्ठाता, श्री वंसतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ यांचे नावे सादर करावयाचे असुन दरपत्रकाच्या लिफाफयावर महाविद्यालय/अतिविशेषोपचार/रुग्णालय/स्त्री रुग्णालय करिता आवश्यक असलेल्या वरिलप्रमाणे दरपत्रक असे स्पष्ट नमुद करण्यात यावे. स्वतःचे नाव व पत्ता लिहावा.

अशा प्रकारे तयार करण्यात आलेले दरपत्रक दिनांक १४/ ०८ /२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत कार्यालयात आणुन देण्यात यावे. तांत्रीक लिफाफा मध्ये दराचा उल्लेख करुन नये त्यामध्ये दर आढल्यास दरपत्रक अग्राहय समजण्यात येईल.

प्राप्त होणा-या दरपत्रकातील तांत्रीक लिफाफे दि. १७/०८ /२०२६ रोजी दु. १२.०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये उघडण्यात येईल. सर्व प्रथम तांत्रीक बाबीचे लिफाफे उघडण्यात येईल. अटी शर्ती

नुसार सर्व कागदपत्रे योग्य आढळल्यास किमंतीचा लिफाफे उघडण्यात येईल. तांत्रीक बाबीची पुर्तता झाली नसल्यास संबंधीत पुरवठादाराचे दरपत्रक रद्य समजन्यात येईल. व त्याचे किमंतीचे लिफाफे उघडण्यात येणार नाही. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल.

जिथे दर द्यावयाचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे ती जागा रिकामी सोडण्यात येवु नये. सर्व दर हे एक नगाकरिता सर्व कर समाविष्ट करुन नमुद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रक नाकारण्याचा अधिकार अधिष्ठांता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यांत येणा-या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्य करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. खालील यादी मधील बाबी लक्षात आल्या नसेल ते पाहण्यासाठी अंदाजपत्रक विभागात उपलब्ध आहे ते आपण पाहु शक्ता.

तसेच दर हे पेनने लिहीन्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे. हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रद्य करण्यात येईल. दरनिश्चिती झाल्यावर आवश्यकते नुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येईल. सदर दरपत्रका सबंधी आपणास काही तक्रार या कार्यालयास दाखल करावयाची असल्यास प्रथम आपल्या या कार्यायात तक्रार सबंधी रु.१०,०००/- शासन खाती जमा करावे लागेल.जर आपण दाखल केलेल्या तक्रारीत या कार्यालयास काही तथ्य आढलुन आल्यास आपणास आपण शासनखाती जमा केलेली रु.१०,०००/-रक्कम परत करण्यात येईल. तक्रारीमध्ये काही तथ्य न आढल्यास रु.१०,०००/- रक्कम परत करता येणार नाही व ती रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.करिता खालील प्रमाणे निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | विवरण | श्री.व.ना.शा. वै.महा. यवतमाळ करीता दर (प्रति वर्ष) (सर्व कर समाविष्टसह) | श्री.व.ना.शा.वै. महा.व अति. रुग्णलय,यवतमाळ करीता दर (प्रति वर्ष) (सर्व कर समाविष्टसह) | श्री.व.ना.शा.वै. महा.व रुग्णलिय,यवतमाळ करीता दर (प्रति वर्ष) (सर्व कर समाविष्टसह) | श्री.व.ना.शा.वै. रुग्णलय व स्त्री रुग्णा, यवतमाळ करीता दर (प्रति वर्ष) (सर्व कर समाविष्टसह) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | वर्ग-१ ते वर्ग- ०४ अधिकारी व कर्मचारी यांचे २४ क्यु TDS संबधीताचा पॅन खात्याला जमा करणे तसेच फॉर्म नं. १६ प्रदान करणे. | | | | |
| ०२ | पुरवठादाराकडून करण्यात येणाऱ्या विविध वस्तू/साहित्य/उपकरणे इत्यादी खरेदी केल्या नंतर प्राप्त देयकानुसार या संस्थेकडून कपात करण्यात आलेले २६ क्यु TDS संबधीताचा पॅन खात्याला जमा करणे तसेच फॉर्म नं. १६ प्रदान करणे. | | | | |
| ०३ | पुरवठादाराकडून खरेदी करण्यात येणाऱ्या विविध वस्तू/साहित्य/उपकरणे इत्यादींचा पुरवठा झाल्यानंतर नंतर प्राप्त देयकानुसार या संस्थेकडून कपात करण्यात आलेले वस्तू व सेवाकर (GST) प्रति माह त्यांच्या (GST Return) खात्याला जमा करणे. | | | | |

अधिष्ठाता 05/08/2025

श्री.वंसतराव नाईक शासकिय
वैद्यकिय महाविद्यालय, व रुग्णालय यवतमाळ